(16)

**BEFORE NATIONAL- LOK- ADALAT HELD AT BARSHI,**
**Dated 14th March 2026**
(Organized by the Member Secretary, District Legal Services Authority, Solapur under Section 19, Legal Services Authority Act1987)

R.C.S. Case No 144 of 2026
Exhibit No.

Name of the Court Which Referred the Case –

Siddheshwar Satpute Applicant /Plaintiff
V/s
Bebinaz (Bibinaz) A. Kadar Sayyad & ors. Respondent /Defendant

Present :-
Name of Judicial Officer – **Smt. P.V. Raut, Jt. C.J.J.D, & J.M.F.C., Barshi. ( Panel Head, National Lok Adalat)**

Name of the members --. Adv. Shri. Kapil K. Bhosale

## AWARD

The dispute between the parties having been referred for determination to the Lok-Adalat and the parties having compromised matter. The following award is passed in terms of the settlement.

**As per pursis filed ~~below Exh~~.** annexed here with

The parties are informed that the court fee, if any, paid by any of them shall be refunded.

| | |
|---|---|
| Applicant/s | Adv. for applicants (Adv. R.R. Ghodake) |
| Respondent's | (Adv. S.S. Lakshetti) Adv. for respondent's, |
| Acquiring Body | Adv. for Acquiring Body |

14.03.2026

(Smt. P.V. Raut)
Panel Head,
National Lok Adalat
Date: 14/03/2026

(Adv. Shri. Kapil K. Bhosale )
Member,
National Lok Adalat
Place:- Barshi

# तडजोड पुरसीस

रे.मु.नं. १४४ /२६

## बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु. डि. यांचे कोर्टात

श्री. सिध्देश्वर बिभिषण सातपुते --------- वादी

विरुध्द

बेबीनाझ (बिबिनाज) अ. कादर सय्यद, वगैरे ४ ---------प्रतिवादी

### यात वादी व प्रतिवादी तर्फे तडजोड पुरसीस की,

प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द डिक्लरेशन व निरंतर ताकीदीचा दावा आणलेला आहे तथापी, यातील वादी व प्रतिवादी यांचे मित्रत्वाचे संबंध असून त्यांनी त्यांचेतील आपसातील संबंध चांगले रहावेत म्हणून वादी प्रतिवादी यांनी तडजोड केलेली आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

सदर तडजोडीन्वये यातील वादीचा दावा प्रतिवादी यांना पुर्णतः मान्य व कबूल आहे. सदर तडजोडीनुसार वादी यांना मालकी हक्कात आजरोजी दिलेल्या मिळकतीचे वर्णन–डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे वैराग हद्दीतील खुल्या प्लॉट जागेचा तपशील गट नं.३६७ क्षेत्र ०.६२.५० हे.आर.चौ.मी.,आकार १ रु.०६ पैसे यापैकी क्षेत्र ०.०१.२५ हे.आर. चौ.मी.याचा आकार ० रु.०२१२ पैसे याचा ग्रामपंचायत तुळशीदास नगर मिळकत नं.२०२ याचे क्षेत्रफळ १३२० चौ.फूट आहे. याचे मोजमाप पुर्व–पश्चिम ६६ फूट व दक्षिण–उत्तर २० फूट एकूण क्षेत्रफळ १३२० चौ.फूट यासी चतुःसिमा पुर्वेस–विजय खोटे जागा, पश्चिमेस–ग्रामपंचायत रस्ता, दक्षिणेस– जरघर यांची मिळकत व उत्तरेस – हनुमंते यांची मिळकत याची वागणूक व पाणी पश्चिम बाजुच्या रस्त्याने आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक खुली प्लॉटजागा आतील सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह. सदरची प्लॉट जागा ही वैराग महसूल हद्दीत असून रहिवाशी झोनमध्ये आहे. प्रतिवादी नं.१ यांचे नाव ७/१२ उताऱ्यावर बिबिनाज अ.कादर सय्यद असे असून आधार कार्डवर बेबिनाज अब्दुलकादर सय्यद असे आहे. प्रतिवादी

(पा.नं.२)

नं.२ यांचे नाव ७/१२ उताऱ्यावर महामुदनवाज अ.कादर सय्यद असे असून आधार कार्डवर महामुदनवाज अब्दुलकादर सय्यद असे आहे. प्रतिवाद नं.३ यांचे नाव ७/१२ उताऱ्यावर खतीब अ.कादर सय्यद असे असून आधार कार्डवर खतीब अ. सय्यद असे आहे. प्रतिवादी नं.४ यांचे नाव ७/१२ उताऱ्यावर अ. शकूर अ.कादर सय्यद असे असून आधार कार्डवर अब्दुल शिकुर अब्दुल कादर सय्यद असे आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे नांव ७/१२ वर व आधार कार्डवर वर उल्लेख केले प्रमाणे असून दोन्ही नावाची व्यक्ती या एकच आहेत. तसेच प्रतिवादी क्र.१ ,३,४ यांनी दि.१०/०३/२०२६ रोजी प्रतिवादी क्र.२ यांच्या हक्कात कुलमुखत्यारपत्राचा दस्त लिहून दिलेला आहे.

दावा मिळकत या प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या मालकिच्या होत्या व कब्जेवहिवाटीची होती व आहे व वारस नात्याचे प्रतिवादी क्र.१ ते ४ हे सदर मिळकतीची ७/१२ हक्कपत्रकी मालक आहेत. प्रतिवादी यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी वरील मिळकत विक्रीस काढली त्याची माहिती लिहून घेणार यांना समजले वरुन प्रतिवादी व वादी यांचेमध्ये बोलने होवून वरील प्लॉट मिळकत विक्री चालू बाजारभावाने मोबदला रक्कम रुपये १,८०,०००/- (अक्षरी एक लाख ऐंशी हजार रुपये) एवढ्या रक्कमेस कायम खुष खरेदी देण्याचे ठरवली व ते वादी प्रतिवादींनी साक्षीदारासमक्ष मान्य व कबूल केले व वादी प्रतिवादींनी कबूल केलेने प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादीकडून सदर खरेदी रक्कम स्विकारली व संपूर्ण खरेदीची रक्कम मिळालेचे कबूल करुन तसा ता.२९/१२/२०२५ रोजी १००/- रुपयाचे कायदेशीर स्टॅम्पवर तसा कब्जे पावतीचा दस्त लिहून दिला, सदर दस्तावर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी लिहून देणार म्हणून सही केलेली आहे. दावा मिळकतीची संपूर्ण खरेदी रक्कम मिळालेने प्रतिवादीनी वादी यांना दावा मिळकतीत जावून चतुःसिमा दाखवून प्रत्यक्ष कब्जा दिला आणि तेव्हापासून वादी हा दावा कलम १ मधिल मिळकतीवर मालकी हक्काने प्रत्यक्ष काबीज असून उपभोग, वापर करत आहेत व सदर मिळकतीचा खरेदीचा दस्त लिहून नोंदवून देण्यास तांत्रिक अडचण असून ती दुर झालेवर/ केलेवर खरेदीचा दस्त लिहून नोंदवून देण्याचे व कब्जे पावतीने दिलेला कब्जा

(पा.नं.३)

मालकी हक्काने करुन देण्याचा होता.

यातील वादी हा ता.२९/१२/२०२५ पासून दावा मिळकतीवर काबीज आहे, दावा मिळकतीचा वादी स्वमर्जीने उपभोग घेत आहे. आजपावेतो प्रतिवादीनी कधीही कोणत्याही प्रकारे वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस, मालकीस हरकत अडथळा केलेला नाही. वर नमूद केलेप्रमाणे वादीकडून प्रतिवादी १ ते ४ यांना दावा मिळकतीची संपूर्ण मोबदला रक्कम मिळालेने वादी हा दावा मिळकतीचा मालक कब्जे वहिवाटदार झालेला आहे. प्रतिवादीचा क्र.१ ते ४ यांचा दावा मिळकतीशी कांहीही संबंध राहिलेला नाही. वादी हा दावा मिळकतीचा शांततामय रितीने उपभोग घेत आहे. वादीने प्रतिवादी यांना अनेकवेळा रजिष्टर खरेदीचा दस्त लिहून नोंदवून देण्याची मागणी केली परंतु तांत्रीक अडचण सांगून प्रतिवादींनी तो अद्याप दिला नाही, टाळाटाळ करत आहेत, कब्जे पावती दस्त लिहून दिलेला आहे परंतू वादीस दावा मिळकतीत त्याची कब्जे वहिवाट मालकी हक्काने असलेबाबत दस्त असल्याशिवाय तुम्हाला नळ वगैरे नागरी सुविधा देता येणार नाहीत असे वैराग नगरपंचायतीने सांगितलेने वादीस अडचणी येवू लागलेल्या आहेत, ही वादीची दाव्यातील विधाने खरी व बरोबर आहेत व प्रतिवादी नं.१ ते ४ यांना मान्य व कबूल आहेत.

अशाप्रकारे यातील वादी हा दावा मिळकतीचे स्वतंत्र कब्जे वहिवाटदार झालेला असून दावा मिळकतीशी यातील प्रतिवादी यांचा अगर अन्य कोणाचाही हक्क अधिकार राहिलेला नाही त्यामुळे वादीची दाव्यातील मागणी प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे व दिनांक २९/१२/२०२५ रोजीचे करारपत्र वादी व प्रतिवादीवर बंधनकारक आहे आणि यातील प्रतिवादी यांनी यापुढे वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करण्याचा नाही हे ही प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

सदर मिळकतीवर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या हिश्यावर बँक तथा पतसंस्था यांचा बोजा असून प्रतिवादी यांनी वादी यांना आजरोजी दिलेल्या क्षेत्रावर कोणत्याही प्रकारचा बोजा नाही अशी हमी दिलेली आहे. जरी ७/१२ हक्कपत्रकी इतर हक्की बँकेचा अथवा पतसंस्थेचा

(पा.नं.४)

बोजा असल्यास तो प्रतिवादी यांच्या उर्वरीत क्षेत्रावर राहील व प्रतिवादी यांनी महसुल दप्तरी वादीच्या नावाची नोंद होणेकामी सही, संमती देण्याची आहे.

वरील प्रमाणे वादी प्रतिवादी यांचे दरम्यान तडजोड झालेली असून सदर तडजोडी प्रमाणे वादीनी दावा मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी, महसूल दप्तरी, नगरपंचायत दप्तरी त्यांचे नावाची नोंद लावून घेवून कर,सारा, घरपट्टी वगैरे भरणेची आहे, त्यांचे मर्जीनुरुप वहिवाट, उपभोग घ्यावा, बांधकाम करावे, प्रसंगी विल्हेवाट लावावी. या दाव्याचा खर्च वादी प्रतिवादी यांनी आपापला सोसण्याचा आहे.

येणेप्रमाणे तडजोड हुकूमनामा व्हावा ही तडजोड पुरसीस दिली.

तारखी : १४/०३/२०२६



वादीतर्फे ॲडव्होकेट

(वादी)



प्रतिवादीतर्फे ॲडव्होकेट

(प्रतिवादी क्र.२ स्वतःकरीता व
प्रतिवादी १, ३, ४ यांचे कुलमुखत्यार म्हणून)